# **Audio System Comprehensive - AMC**

## दुरूस्ती व देखभाल करणेबाबत जाहीर नोटीस

मा. प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीशसो, कोल्हापूर यांचे आदेशान्वये जाहीर करणेत येते की, जिल्हा न्यायालय, कोल्हापूर व त्यांचे अधिपत्याखालील असणारे जिल्हा न्यायालय-१, इचलकरंजी/जयसिंगपूर, दिवाणी व फौजदारी न्यायालय, पेठवडगांव या तालुका न्यायालयातील वापरात असलेले मे. जेडी एंटरप्रायजेस आणि ग्लीटर्स गीग्स यांचेमार्फत बसविणेत आलेली २९ ऑडीओ सिस्टीम व त्याचे इतर साहित्याची (उदा. स्पीकर्स, कॅमेरे, अम्प्लीपायर, टीव्ही, त्यासाठी लागणा–या केबल्स इ.) स्थानिक पातळीवर **(Comprehensive-AMC with all components)** दुरूस्ती व देखभाल वार्षिक करार करणेसाठी मोहोरबंद दरपत्रक (निविदा) मागविणेत येत आहेत. तरी इच्छूक सेवाधारकांनी सदरची जाहिरात प्रसिध्द झाले पासून आठ दिवसांच्या आत **२९ ऑडीओ सिस्टीम** ची पाहणी व माहिती घेणे करिता मा. जिल्हा न्यायालय, कोल्हापूर येथील संगणक विभाग येथे प्रत्यक्ष भेट देउन सदरची निविदा भरणेचे आहे. नोंदणीकृत व इच्छुक सेवाधारकां कडून सदरची जाहीरात प्रसिध्द झालेपासून दिनांक **०४/०४/२०२६** रोजी दुपारी २.०० वाजेपर्यत मोहोरबंद निविदा सादर करावयाच्या आहेत याची निविदाधारकांनी नोंद घ्यावी. ज्यांना निविदा भरणेची आहे त्यांनी खालील अटीस पात्र राहून दि. **०४/०४/२०२६** रोजी दुपारी ०२.०० वाजेपर्यंत मा. जिल्हा न्यायालय, कोल्हापूर येथे पोहोचतील अशा रितीने निविदा सादर कराव्यात. **या सोबत Audio System बाबत माहितीसाठी दुरूस्ती व देखभाल करणेसाठी नियम व अटी जोडलेले आहेत.**

हुकूमावरून,

सहा. अधिक्षक (वित्त),
जिल्हा व सत्र न्यायालय, कोल्हापूर

दिनांक - २५/०३/२०२६

## दुरूस्ती व देखभाल करणेसाठी नियम व अटी खालीलप्रमाणे

| | |
|---|---|
| ०१. | मोहरबंद निविदा ही मा. प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, कोल्हापूर या नावाने दिनांक ०४/०४/२०२६ इ रोजी कार्यालयीन वेळेपर्यंत सुटटीचे दिवस वगळून किंवा त्यापूर्वी या कार्यालयास पोहोचतील अशा बेताने सादर करावयात त्यानंतर प्राप्त झालेल्या निविदा स्विकारल्या जाणार नाहीत. |
| ०२. | सदरहू निविदा सूचनेतील नमूद ऑडीओ सिस्टीमसाठी कोणत्याही परिस्थितीत, कोणत्याही टप्प्यावर कोणत्याही क्षणी अथवा संपूर्णतः वगळण्याचे अधिकार मा. प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीशसो, कोल्हापूर यांना राखून ठेवले आहेत. |
| ०३. | कोणतीही एक अथवा सर्व दरपत्रके कारण न देता नाकारण्याचा अधिकार मा. प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, कोल्हापूर यांनी स्वत:कडे ठेवला आहे. |
| ०४. | ऑडीओ सिस्टीम व त्याचे इतर साहित्याची वार्षीक देखभाल/दुरूस्ती करार हे जिल्हा न्यायालय, कोल्हापूर व त्यांचे अधिपत्याखालील असणारे जिल्हा न्यायालय-१, इचलकरंजी/जयसिंगपूर, दिवाणी व फौजदारी न्यायालय, पेठवडगांव या तालुका न्यायालयांकरिता राहील. |
| ०५. | मुख्यालयी असलेल्या अभियंत्यास दूरध्वनीव्दारे ऑडीओ सिस्टीम व त्याचे इतर साहित्याची दुरूस्ती संदर्भात तक्रार दिल्यास त्यांना त्याची नोंद घ्यावी लागेल व ती त्यांना स्विकारावी लागेल. |
| ०६. | तालुका न्यायालयातील ऑडीओ सिस्टीम व त्याचे इतर साहित्याची दुरूस्ती करतेवेळी सुटे भाग दुरूस्ती करिता नेल्यास दोन दिवसाचे आत सदरहू सुटे भाग दुरूस्त करून जोडणे बंधनकारक राहील. |
| ०७. | निविदा स्विकारणे अथवा नाकारणेचा अंतिम अधिकार मा. प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीशसाो, कोल्हापूर यांना राहतील. |
| ०८. | वरील नमूद न्यायालयातील सर्व्हर्स हे Linux/Ubantu Operating System/Case Information System यासाठी वापरली जातात याची नोंद घ्यावी. |
| ०९. | दरपत्रक मंजूर झाल्यावर संबंधितांना ५००/- रूपयाचे बॉन्ड पेपरवर आपला करार करून द्यावा लागेल व सदरहू ५००/- रूपयाचे बॉन्ड पेपरचा खर्च संबंधीतांस सोसावा लागेल. सदरचा करार हा कराराचे दिनांकापासून एका वर्षाचा राहील. |
| १०. | वार्षिक देखभाल/दुरूस्ती करारावर राज्य व केंद्र सरकारचे आकारण्यात येणारे सर्व प्रकारचे कर जसे की, (G.S.T., Income Tax etc.) दरपत्रक मंजूर झालेल्या संबंधीत सेवापुरवठादाराला सोसावे लागतील या कार्यालयाकडून सदर प्रकारचे कोणतेही कर संबंधीतास अदा करण्यात येणार नाहीत. |
| ११. | ऑडीओ सिस्टीम व त्याचे इतर साहित्याची सर्वसमावेशक (Comprehensive) देखभाल/दुरूस्ती करार असल्यामुळे त्यांची विविध सुटे पार्ट करणे व दुरूस्त न झाल्यास बदलून देणे करारामध्ये समाविष्ठ राहतील, त्याबाबतचे वेगळे देयक अदा केले जाणार नाही. |

| | |
|---|---|
| १२. | देयक हे त्रैमासिक पध्दतीने सादर करावे व सादर केल्यावर नियमानुसार अदा करणेत येईल. |
| १३. | देयक हे संपूर्ण तपशिलासह या कार्यालयाला सादर करावे लागेल. |
| १४. | राज्य व केंद्र सरकारचे सर्व कर वगळून देयक अदा करणेत येईल. |
| १५. | एखाद्या निविदाधारकाविरुध्द खरेदी प्रक्रियेसंदर्भात दिवाणी दावा अथवा फौजदारी खटला असल्यास त्यांनी निविदा भरु नये, तसे निदर्शनास आलेस कायदेशीर कारवाई केली जाईल. |
| १६. | पुरवठादारांनी या कार्यालयाने ज्या प्रकारचे साहित्याची मागणीची निविदा प्रसिध्द केलेली आहे त्याच प्रकारच्या साहित्याची निविदा भरणेची आहे. अन्य निविदेचा विचार केला जाणार नाही. |

**<u>प्रत माहितीकरिता व नोटीस बोर्डावर प्रसिध्दीकरिता.</u>**

१) संगणक विभाग प्रमुख, जिल्हा न्यायालय, कोल्हापूर यांना सुचित करणेत येते की, सदरील निविदा जिल्हा न्यायालय, कोल्हापूरचे (http://ecourts.gov.in/kolhapur) वेबसाईटवरती प्रकाशित करणेत यावी.

२) जिल्हा व सत्र न्यायालय, कोल्हापूर नोटीस बोर्ड.

३) मा. जिल्हाधिकारी, कोल्हापूर नोटीस बोर्ड.

४) मा. दिवाणी न्यायाधीश, वरिष्ठ स्तर, कोल्हापूर नोटीस बोर्ड.

५) मा. मुख्यन्यायदंडाधिकारी, कोल्हापूर नोटीस बोर्ड.

६) मा. तहसिलदार, कोल्हापूर नोटीस बोर्ड.

७) कोल्हापूर महानगरपालिका, कोल्हापूर नोटीस बोर्ड.